REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# कार्ल मार्क्स : आर्थिक विचार काल आज आणि उद्या

डॉ. डी. आर. बाड
सहयोगी प्राध्यापक , उमा महाविद्यालय, पंढरपूर.

## प्रास्ताविक –

कार्ल मार्क्स हे जर्मन ज्यू होते. त्यांचा जन्म १८१८ मध्ये झाला.त्यांचे सर्व जीवन अस्थिर आणि दारिद्र्यात गेले.समाजामध्ये दोन घटकातील द्वंद्वांमुळे समाजाचाविकास होतो. समाजात उत्पादन करणारे श्रमिक आणि श्रम न करता उत्पादनावर नियंत्रण करणारे मालक यांच्या वर्ग संघर्षातूनच आर्थिक इतिहास घडतो असे त्यांचे मत होते.या आशयाला अनुसरुन मार्क्सने भांडवलशाहीची अर्थशास्त्रीय चिकित्सा करणारे अनेक ग्रंथ लिहले,भांडवलशाहीमध्ये मालक वर्ग कामगारांची पिळवणूक करतो. कामगारांनी एकजुटीने मालकाविरुद्ध लढा दिल्यास किंवा भांडवलशाही मधील अन्यायकारक तत्वाविरुद्ध बंडपुकारल्यास उत्पादनाच्या साधनांचा आणि राज्यसत्तेचा ताबा कामगारांकडे येवू शकतो. कामगारांच्या हाती उत्पादनाची साधने आल्यास भांडवलशाहीला शह बसून सर्वसामान्य कामागारांच्या हाती सत्ता येवून साम्यवादी अर्थव्यवस्था म्हणजे समाजाची मालकी असणारी व्यवस्था निर्माण होईल असा मार्क्सला विश्वास होता.


मार्क्सचे हे विचार १८ व्या आणि १९ व्या शतकातील पुर्वार्धातील त्या काळातील इंग्लंडमधील घडून आलेली औद्योगिक क्रांती आणि त्यामुळे समाजात निर्माण झालेले कामगार मालक असे दोन वर्ग यामुळे कामगारांची होणारी पिळवणूक याचा मार्क्सने जवळून अभ्यास केला. कारण १९४९ पासून मार्क्सचे इंग्लंडमध्ये वास्तव्य होते. इंग्लंडनंतर बऱ्याचशा युरोपियन देशामध्ये भांडवलशाही फोफावलेली होती. या भांडवलशाहीमध्ये सर्वसामान्य कामगार वर्गाची मोठी पिळवणूक होते. या पार्श्वभूमीवर मार्क्सने दास कॅपिटल हा २५०० पानांचा जगप्रसिद्ध ग्रंथ लिहला.

## शोधनिबंधाची उद्दिष्टये –

१) मार्क्सच्या विचारांना उजाळा देणे.
२) मार्क्सच्या विचाराची तत्कालीन परिस्थिती समजून घेणे.
३) भांडवलशाही संबंधीचे मार्क्सचे विचार समजून घेणे.
४) मार्क्सचे विचार आणि आजची परिस्थिती यातील साम्य.
५) भविष्यात मार्क्सवादाची आवश्यकता यावर प्रकाश टाकणे.

## संशोधन पद्धती–

सदर शोधनिबंध दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित असून त्यासाठी संदर्भ ग्रंथ, मार्क्सवरील ग्रंथ, मार्क्सचे सिद्धांत आणि सद्यस्थितीतील वास्तव याचा आधार घेतलेला आहे.काही मते संशोधकाची स्वतःची आहेत.



## मार्क्सचे तत्कालीन परिस्थितीला अनुसरुन साम्यवादी विचार –

जगामध्ये भांडवलशाहीची सुरुवात आणि तिचा विस्तार होत असताना भांडवलशाहीने वेगाने औद्योगिकरण घडवून आणले. परंतु त्यामुळे आर्थिक विषमता वाढीला लागून सामाजिक अशांतता निर्माण झाली. नफ्याच्या अभिलाषेपोटी कामगारांची आणि सर्वसामान्यांची पिळवणूक होवू लागली. या तत्कालीन परिस्थितीवर

कामगारांच्या मालकीची सत्ता असलेली साम्यवादी विचारसरणी किंवा अर्थव्यवस्था असावी अशी विचारधारा रुजू लागली. यामध्ये रॉबर्ट ओवेन, फोरियर, लुई ब्लॅक, सायमन यांनी मांडलेला साम्यवाद हा स्वप्नाळू समाजवाद म्हणून ओळखला जातो. परंतु या सर्वापेक्षा मार्क्सचा साम्यवाद वेगळा होता. स्वप्नाळू समाजवाद्यांनी समाजवादाचा पाया घातला परंतु प्रत्यक्षात आदर्श समाजरचना कशी घडवून आणावी त्याची व्यावहारिक व तर्कसंगत चर्चा मार्क्सने केली. चांगला समाजवादी समाज प्रत्यक्षात आणण्यासाठी लागणारी साधने आणि विचार यांची तर्कसंगत मांडणी मार्क्सने केली. त्यातूनच मार्क्सचा मूल्य सिद्धांत किंवा श्रममूल्य सिद्धांत, अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत, अतिरिक्त मूल्याचा किंवा शोषणाचा दर, नफ्याचा दर, आर्थिक विकासाचे सिद्धांत असे अनेक सिद्धांत मार्क्सने मांडलेले आहेत. ही मार्क्सची विचारसरणी भांडवलशाहीच्या दोषावर बोट ठेवणारी होतीच परंतु ती साम्यवादाचा पुरस्कार करणारी होती. त्यावेळी जग एका वेगळ्या उंबरठ्यावर होते. त्या काळात कामगारांची होणारी पिळवणूक व भांडवलदार कामगारांच्या श्रमावर त्यांच्या पिळवणुकीत कसे अतिरिक्त मूल्य निर्माण करतात. भांडवलदाराचा नफा म्हणजे कामगारांना त्यांच्या श्रम मूल्याइतकी मजुरी दिली जात नाही ती कमी दिली जाते त्यातूनच मालक भांडवलाच्या जोरावर व संघटितपणाच्या जोरावर कामगारांची पिळवणूक करतात. हे मार्क्सने पटवून देण्याचा प्रयत्न केला. यासाठीच त्याने मूल्यविषयक सिद्धांत व अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत अशी अर्थशास्त्रीय सिद्धांताची मांडणी केली. मार्क्सच्या मृत्युनंतर मार्क्सची विचारसरणी जगामध्ये रुजली आणि त्यातून मार्क्सला अभिप्रेत असणारी साम्यवादी अर्थव्यवस्था रशिया सारख्या अनेक देशामध्ये निर्माण झाली. परंतु नंतर या व्यवस्थेमध्येही दोष निर्माण झाले. भांडवलशाही पेक्षा वेगाने अशा अर्थव्यवस्थामध्ये सुरुवातीला विकास झाला परंतु केंद्रीय नियोजन व सत्तेचे केंद्रीकरण यामुळे यातून जगामध्ये हुकूमशाही जन्माला आली आणि साम्यवादी विचारसरणीला घरघर लागली.

## पुन्हा भांडवलशाहीकडे वाटचाल –

१९९१ नंतरच्या काळात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा केलेला अवलंब, गॅट कराराची अंमलबजावणी यामुळे जगात पुन्हा भांडवलशाहीचे महत्व वाढीस लागले. भारतासारख्या देशामध्ये भांडवलशाही आणि साम्यवाद यांच्या मिश्रणातून तयार झालेली अर्थव्यवस्था प्रगतीपथाकडे जात असताना साम्यवादी/समाजवादी व्यवस्थेमध्ये सरकारच्या मालकीचे असणारे उद्योगधंदे केंद्रीय नियंत्रण आणि अधिकारांचा गैरवापर यामुळे बंद पडू लागले. परिणामी १९९१ नंतर पुन्हा खाजगीकरणाची वाटचाल सुरु झाली. याठिकाणी कार्ल मार्क्सच्या विचारांना तिलांजली देण्याचे काम करण्यात आले. परिणामी पुन्हा एकदा रशिया सारख्या साम्यवादी अर्थव्यवस्थेचे प्राबल्य कमी होवून युरोपियन आणि अमेरिकन भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे प्राबल्य वाढले आणि जगामध्ये साम्यवाद चांगला नाही त्यापेक्षा लोकशाही व्यवस्थेमधील भांडवलशाहीकडे जागतिक अर्थव्यवस्था झुकू लागली. आणि पुन्हा नविन अर्थनीतिवर आधारित खाजगीकरण उदारीकरण, जागतिकीकरणाचे (खाउजा) धोरण राबविले जाऊ लागले. त्याचे दुष्परिणाम जगतील लअनेक दंशांच्या अर्थव्यवस्थांवर दिसू लागले आहेत. भारतासारख्या देशामध्येही हे प्रकर्षाने जाणवले आहे. गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावत आहे. तर भांडवलाना पुन्हा महत्व प्राप्त होत आहे. त्यातून गरीब आणि श्रीमंत अशी विभागणी लोकांच्यामध्ये आणि जगामध्येही होत आहे. परिणामी सद्यस्थितीतून बाहेर पडण्यासाठी पुन्हा मार्क्सच्या विचारांची आवश्यकता भासत आहे.

## आजची सद्यस्थिती आणि भविष्यातील मार्क्सच्या विचारसरणीचे महत्व –

जगामध्ये सुरुवातीला भांडवलशाहीचा उदय झाला. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमधील भांडवलशाही परिपक्व झाल्यानंतर ती जगातील इतर देशामध्येही यशस्वी झाली. परंतु भांडवलशाहीच्या दोषावर बोट ठेवण्याचे धाडस कार्ल मार्क्स सारख्या साम्यवादी विचारसरणीच्या अर्थशास्त्रज्ञाने केले. मार्क्सच्या मृत्युनंतर जगाला मार्क्सवाद कळला. आणि त्याचा परिणाम म्हणून जगातील बऱ्याच देशामध्ये साम्यवादी विचारसरणी रुजून अनेक देशात साम्यवादी अर्थव्यवस्था उदयास आल्या. आणि त्यांनी आपला वेगाने विकास साधला. भारतासारख्या देशानेही समाजवादी समाजरचनेचे ध्येय समोर ठेवून अर्थव्यवस्थेची प्रगतीच्या दिशेने वाटचाल केली. परंतु मार्क्सवादाचा अतिरेक झाल्याने काही राष्ट्रात हुकूमशाही निर्माण झाली. परिणामी साम्यवादाला घरघर लागली. १९९१ नंतर जगामध्ये नविन आर्थिक धोरणाची अंमलबजावणी होवून पुन्हा साम्यवादाकडून भांडवलवादाकडे आणि उदारमतवादाकडे जागतिक अर्थव्यवस्थांनी मार्गक्रमण केले. परंतु भांडवलशाहीने तळागाळातील समाजाची पिळवणूक होते हे मार्क्सने विविध सिद्धांताच्या सहाय्याने जे पटवून दिले त्याची प्रचितीबदलत्या काळामध्ये पुन्हा येवू लागली आहे. समाजामध्ये दोन वर्ग निर्माण होवून गरीब बेरोजगार शेतकरी आणि कामगार यांची दयनीय अवस्था या बदलत्या अर्थकारणाने होत आहे. परिणामी जगाला पुन्हा एकदा सर्वसामान्यांची पिळवणूक थांबविण्यासाठी आणि भांडवलशाहीचे दोष दूर

करण्यासाठी साम्यवादाची गरज भासत आहे. साम्यवाद आणि सहकार या माध्यमातून भांडवलशाहीचे दोष दूर करता येतात. आणि एक चांगली समाजरचना निर्माण करता येते. यासाठी पुन्हा मार्क्सच्या विचारांची गरज जगाला निर्माण झोलेली आहे. भारतासारख्या देशामध्येही वाढती बेकारी, दारिद्र्य, विषमता या समस्या विचारात घेता समाजवादी समाजरचनेची आवश्यकता भासत आहे. त्यासाठी मार्क्सवाद मार्गदर्शक ठरु शकतो. भांडवलशाहीला काही प्रमाणात लगात घालून केंद्रीय सत्तेच्या माध्यमातून समाजाच्या गरजा भागविणे आवश्यक आहे.

## भविष्यकाळासाठी मार्क्सवादाची आवश्यकता व गरज :-

१) विषमता कमी करण्यासाठी
२) बेकारी कमी करणे आणि कामाचा योग्य मोबदला कामगारांना मिळण्यासाठी
३) कामगारांचे हक्क आणि अधिकार अबाधीत राखण्यासाठी
४) दुर्लक्षित घटकांना सुरक्षा पुरविण्यासाठी आणि आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी
५) देशाचा आत्मसन्मान आणि आत्मनिर्भरता घडवून आणण्यासाठी.
६) शिक्षण, आरोग्य या सेवा गरीबापर्यंत मोफत आणि आवश्यक तेव्हा पुरविण्यासाठी आज खऱ्या अर्थाने मार्क्सवादाची गरज आहे.

बहुतांश मागासलेल्या आणि अविकसित, विकसित देशामध्ये वरील प्रकारच्या असणाऱ्या आर्थिक समस्या सोडविण्यासयाठी मार्क्सच्या विचारांचा सिद्धांताचा अभ्यास करुन एक चांगली अर्थनीती की, जी भांडवलशाहीच्या दोषावर उपाय शोधेल आणि साम्यवादाचाही अतिरेक होणार नाही अशी एक आदर्श व्यवस्था निर्माण होण्यासाठी पुन्हा मार्क्सवादाचा आधारा घ्यावा असे वाटते.

## संदर्भ -

१) आर्थिक विचारांचा इतिहास- एल.एच. हॅनी
२) दी टिचिंग ऑफ कार्ल मार्क्स - व्ही. एल. लेनिन
३) कार्ल मार्क्स थेअरीज ऑफ सरप्लस व्हॅल्यू
४) मार्क्स अॅज अॅन इकॉनॉमिस्ट - मॉरिस डुबे
५) आर्थिक कल्पनांचा विकास- के.एच. ठक्कर
६) यांनी घडवल सहस्त्रक- १००१-२००० रोहन प्रकाशन पुणे-२ आक्टो-२००३ सुहास कुलकर्णी मिलींद चंपानेरकर
७) विविध बेबसाईटस् आणि वृत्तपत्रातील लेख